जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३८ दिनांक - १५/०१/२०२४**

लोणीकंद पोलीस स्टेशन,पुणे शहर

## मिसींग झाल्याचा बनाव करुन खुन केलेल्या गुन्हयाची लोणीकंद पोलीसांनी केली उकल

दिनांक २८/१०/२०२३ रोजी एक ३८ वर्षीय महिला मिसींग झाली होती. तिचा पती नामे अमोलसिंग मुरली जाधव वय २६ वर्षे, रा. भैरवनाथ मंदीराजवळ, महेश गोरे यांचे भाडयाचे खोलीत फुलगाव ता. हवेली जि. पुणे. मुळ रा. मु.पो. अंजिनाईक ता. अरणी जि. यवतमाळ तसेच घर नं. ४/५ ४७६,गायत्री मंदीर नवीन पुल नांदेड याने दिलेल्या खबरीवरुन लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर या ठिकाणी मनुष्य मिसींग रजि क्रं. १९३/२०२३ अन्वये मिसींग दाखल करण्यात आली होती. सदर मिसींगचा तपास पोलीस अंमलदार प्रकाश आव्हाळे यांचेकडे होता.

मिसींग दाखल झाले पासुन तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक, रविंद्र गोडसे हे त्यांना मार्गदर्शन करीत होते. तपासा दरम्यान आरोपी अमोलसिंग मुरली जाधव याने त्याचे नातेवाईकांची नावे पोलीसांना पुरविली व स्वतःही सदर मिसींगचे तपासकामी मदत केली. काही ठिकाणी तो स्वतःच पोलीसांसोबत पत्नीचा शोध घेण्यासाठी गेला. सदरचा आरोपी हा इंन्प्रो प्रा.लि. मरकळ पुणे या कंपनीमध्ये मजुरी काम करीत होता त्याची पत्नी गृहीणी होती. मिसींग दाखल केल्याच्या दिवशी तो दिवसभर कामावर हजर असल्याचे तो काम करीत असलेल्या कंपनीत गेटवर केलेल्या नोंदीवरुन समोर आले. त्याने स्वतःचा मोबाईलही १५ दिवसापासुन बंद असल्याचे सांगितले. “ दृष्यम ” सिनेमाप्रमाणे त्याचे स्वतःवर संशयाची सुई येवु नये याची पुरेपुर त्याने खबरदारी घेतली होती. मिसींग महिलेचा शोध घेण्याचे पोलिसांचे सर्व प्रयत्न फोल ठरत होते. त्यामुळे पती अमोलसिंग मुरली जाधव यालाच वारंवार तपासकामी बोलाविले गेले. प्रत्येक वेळी तपासामध्ये त्याचे बोलण्यामध्ये थोडी थोडी विसंगती येत असल्याचे निर्दशनास येवु लागले. तसेच त्याचे चेह-यावरील भाव हे पुर्णपणे नैसर्गिक नसल्याचे निदर्शनास आले त्यामुळे त्यावरील संशय वाढतच गेला.

अखेरीस दिनांक १३/०१/२०२४ रोजी सपोनि गोडसे व पोलीस अंमलदार प्रकाश आव्हाळे यांनी वपोनि श्री. विश्वजित काइंगडे यांचे मार्गदर्शनाखाली केलेल्या चौकशीदरम्यान त्याने २८ ऑक्टोबर रोजी वाई सातारा जवळील मांढरदेवी घाटात पत्नीची गळा दाबुन हत्या केल्याची व तिचे प्रेत दरीत ढकलुन दिल्याची कबुली दिली. त्यावर लगेचच पोलीस उप निरीक्षक श्री रेशीम कोळेकर, पोलीस अंमलदार स्वप्निल जाधव, अजित फरांदे यांचे एक पथक तयार करण्यात आले. व ते मांढरदेवी देवस्थान, वाई या ठिकाणी रवाना करण्यात आले. सदर पथकाने मांढरदेवी देवस्थान, वाई घाटात सुमारे २०० ते २५० फुट खोल दरीत उतरुन कसोशीने शोध घेतला. अथक प्रयत्न केल्यावर सुमारे अडीच महीन्यापुर्वी मृत्यु झाला असल्याने त्यांना मिसींग महिलेचा केवळ सांगाडा तिची चप्पल, साडी व बांगडया मिळुन आल्या. मयत महिलेच्या सांगाडयाचे ससुन हॉस्पीटल, पुणे या ठिकाणी शवविच्छेदन करण्यात आले आहे.

पोलीस अंमलदार प्रकाश आव्हाळे यांच्या फिर्यादीवरुन आरोपी नामे अमोलसिंग मुरली जाधव वय २६ वर्षे, रा. भैरवनाथ मंदीराजवळ, महेश गोरे यांचे भाडयाचे खोलीत फुलगाव ता. हवेली जि. पुणे. मुळ रा. मु.पो. अंजिनाईक ता. अरणी जि. यवतमाळ तसेच घर नं. ४/५ ४७६  गायत्री मंदीर नवीन पुल नांदेड. याचे विरुध्द लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.नं. ३२/२०२४ भारतीय दंड संहिता कलम ३०२,२०१,१८२ अन्वये गुन्हा नोंदविला असुन सदर गुन्हयात आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पत्नी आपल्यापेक्षा बारा वर्षांनी मोठी आहे, आपली इच्छा नसतानाही पालकांनी आपले तिच्याशी लग्न लावुन दिले आहे, तसेच ती थोडी मंदबुध्दी आहे. त्यामुळे आरोपीने तिला घटस्फोट देण्याचा प्रयत्न केला परंतु तिने त्याला नकार दिल्याने अमोलने तिचा कायमचा काटा काढायचे ठरवले व अत्यंत थंड डोक्याने व नियोजनबध्द पध्दतीने सदरचा खुन केला. परंतु अडीच महिन्यानंतर का होईना कायदयाचे हात त्याचेपर्यंत पोहचले.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर,श्री. रंजनकुमार शर्मा मा. पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ४, पुणे श्री. विजय मगर मा.सहा. पोलीस आयुक्त येरवडा विभाग, पुणे श्री. संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा छडा लोणीकंद पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विश्वजित काइंगडे, तपास पथकाचे सपोनि रविंद्र गोडसे, पोलीस उप निरीक्षक रेशीम कोळेकर, पोलीस अंमलदार प्रकाश आव्हाळे, स्वप्निल जाधव, अजित फरांदे यांनी केली आहे.